REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २५ फेब्रुवारी १९४८ अंक ७


## सारस्वत
### को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई



टे. नं. ३१६७५ ता. ३१-१-१९४८

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु ३,९८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,११,००० |
| ठेवी ... | रु. ७६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ८३,५०,००० |

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा

सब-ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

– शेड्यूल्ड बँक –

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ३,९०,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. धों. कृ. साठे ( चेअरमन ), श्री वा. पुं. वर्दे ( व्हाइस चेअरमन ), श्री. न. ग. पवार, श्री श्री. गो. मराठे, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पदमजी, श्री मा. वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. भा. म. गुप्ते, श्री. मो. रा. ढमढेरे.

★चालू खात्यांवर द. सा. द. शें. ½ टक्का व्याज दिलें जातें.
★सेव्हिंग्ज खात्यांत द. सा. द. शें. १॥ टक्का व्याज मिळतें.
★मुदती ठेवींची रक्कम तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत स्वीकारली जाते.
★सोलापूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्‌ची व्यवस्था केली आहे.

मुख्य कचेरी लक्ष्मी रोड, पुणें २ } सी. व्ही. जोग, मॅनेजर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

कार्ड पाठवून व्ही. पी. नें मागवा रक्तवर्धक खुराक **आंबावडी** फडके प्रॉडक्टस् नागनाथ पार, पुणें.

**नं. २० साबण** बार सोप आणि वडी वापरा

माणिक सोप वर्क्स, कराड ( जि. सातारा )

# सहकारी कायद्यांत महत्त्वाच्या सुधारणा

सन १९२५ चा मुंबई सहकारी सोसायट्यांचा कायदा दुरुस्त करण्याच्या उद्देशानें मुंबई सरकारनें एक बिल तयार केलें आहे. १९४२–४३ मध्यें ह्या कायद्यांत कांहीं दुरुस्त्या करण्यांत आल्या होत्या, त्यांचाहि परामर्श ह्या बिलानें घेतलेला आहे, कांहीं दुरुस्त्या मामुली स्वरूपाच्या आहेत, तर कांहीं फारच महत्त्वाच्या आहेत. अशा महत्त्वाच्या दुरुस्त्यांकडे हितसंबंधी लोकांचें लक्ष वेधण्यासाठीं व त्यांच्या विचारांस चालना देण्यासाठीं येथें त्या दुरुस्त्यांचा उद्देश व तपशील दिला आहे.

नव्या बिलांतील ज्या दुरुस्त्या सहकारी सोसायट्यांच्या सर्वसाधारण सभासदांस लागू होण्याजोग्या आहेत त्यांचाच परामर्श येथें घेण्यांत आला आहे. बिलांतील सर्व ३४ कलमांची तपशीलवार छाननी करण्याचा येथें उद्देश नाहीं.

| उद्देश | दुरुस्ती |
| --- | --- |
| (१) अमर्याद जबाबदारीच्या तत्त्वामुळें प्राथमिक सहकारी सोसायट्यांच्या स्थापनेस व वाढीस अडचण येते, अशी तक्रार आहे. ज्या सोसायट्यांच्या सभासदांत इतर सोसायट्या आहेत, अशांची जबाबदारी मात्र "मर्यादित" असावी. | (१) अमर्याद जबाबदारीची अट सक्तीची न करता, ती वैकल्पिक असावी अशी दुरुस्ती सुचविण्यांत येत आहे. आपले बायलॉज बदलून, सोसायटी 'मर्यादित'ची "अमर्यादित" व "अमर्यादित "ची " मर्यादित " होऊं शकेल. |
| (२) शहरी व ग्रामीण आर्थिक संसारांत सहकारी सोसायट्या आतां अधिकाधिक भाग घेऊं लागणार व त्यांचें कार्यक्षेत्र वाढणार. तेव्हां, त्यांस शेअर भांडवलहि मोठें लागणार. आतां चलनाची किंमतहि उतरली आहे. | (२) ह्यापुढें सोसायटीच्या सभासदास १० हजार रुपयांचे शेअर्स स्वतःच्या नांवें घेतां येतील. ह्यापूर्वीची मर्यादा ३ हजारांची होती. |
| (३) सहकारी सोसायटीचें दोन किंवा अधिक सोसायट्यांत रूपांतर करण्याची सोय मद्रास वगैरे प्रांतांतून आहे, तशी आपल्या प्रांतांत असावी. | (३) रजिस्ट्रारच्या संमतीनंतर तीनचतुर्थांश मतें पडल्यास, सोसायटी आपलें दोन किंवा अधिक संस्थांत रूपांतर करूं शकेल, अशी तरतूद करण्यांत येत आहे. |
| (४) मूळ कायदा केला, तेव्हां एकच शेअर दोघे किंवा अधिक लोक धारण करतील अशी अपेक्षा नव्हती, परंतु सोसायट्यांत तसे शेअर्स असतात, त्यास संमति देणें जरूर आहे. | (४) ज्याचें शेअर सर्टिफिकेटावर पहिलें नांव असेल, त्यासच मताचा अधिकार ठेवण्यांत यावयाचा आहे. |
| (५) आतां सोसायट्यांना दीर्घ कर्जांची व इतर कर्जांची व्यवस्था पत्करावी लागणार आहे, त्यामुळें त्यांवरील आर्थिक जबाबदारी वाढणार आहे. तेव्हां, सभासद ज्या सोसायटीचा सभासद असेल व जिच्याकडून तो कर्ज घेईल, तिला त्यानें आपली स्थावर मिळकत लावून देणें आवश्यक आहे. सरकारी कर्जांच्या व मुंबई कर्जनिवारण कायद्याखालील हुकूमनाम्यांच्या वसुलीचा अग्रहक्क मात्र कायम राहील. | (५) प्रत्येक अर्जदारानें आपल्या अर्जाबरोबर, कर्जाचे पोटीं लावून द्यावयाच्या स्थावर मालमत्तेचा तपशील दिला पाहिजे. प्रस्तुत दुरुस्ती अमलांत येण्यापूर्वी ज्यांनीं कर्ज काढलें अशांनींहि अशा तारणास मान्यता दिली पाहिजे. कर्जफेड झाल्याविना ह्या मालमत्तेची विल्हेवाट सभासदास करतां येणार नाहीं. सोसायटीच्या संमतीनें मालमत्तेवरील उभें पीक विकता येईल. |
| (६) सभासदांच्या मालाची संघटित विक्री करणाऱ्या आणि अशा विक्रीसाठीं घेतलेल्या मालाचे तारणावर सभासदांस कर्जे देणाऱ्या अमर्यादित जबाबदारीच्या सोसायट्यांस प्रोत्साहन दिलें जात आहे, परंतु हा व्यवहार हातीं घेण्यास रजिस्ट्रारची परवानगी लागते. | (६) ह्या संबंधांत प्रांतिक सरकारनेंच सर्व साधारण किंवा विशिष्ट हुकूम काढून, कोणत्याहि सोसायटीनें स्थावर अथवा जंगम मालाचे तारणावर कर्जें देण्यावर बंधनें घालावीं किंवा अशा कर्जांस प्रतिबंध करावा. |
| (७) सध्याच्या कायद्याच्या २७ व्या कलमांत सोसायटीनें आपले पैसे कोठें गुंतवावें हें नमूद केलेलें आहे. हे निर्बंध कडक आहेत. | (७) ह्या व्यतिरिक्त इतर ठिकाणीं पैसे गुंतविण्यास मान्यता देण्याचा सरकारला अधिकार देण्यांत येत आहे. |
| (८) इतर ठिकाणच्या पेक्षा सहकारी संस्थांत गुंतविलेल्या रकमा अधिक किफायतशीर होणें इष्ट नाहीं. पूर्वी व्याजाचे दर भारी होते. | (८) सध्या सोसायटी कमाल १०% पर्यंत डिव्हिडंड देऊं शकते. ह्यापुढें हा दर ६¼% वर आणण्यांत येईल. |
| (९) सहकारी शिक्षण कमीटीनें सुचविलें कीं, सहकारी ट्रेनिंग कॉलेज, प्रादेशिक सहकारी शाळा व सहकारी जिल्हा वर्ग ह्यांत सहकारी सोसायट्यांच्या नोकरवर्गाचें शिक्षण होणार आहे, तेव्हां सोसायट्यांनीं इन्स्टिट्यूटचे शिक्षण फंडास हातभार लावावा. | (९) ४% किंवा त्यापेक्षा ज्यास्त दरानें आपल्या भागीदारांस डिव्हिडंड देणाऱ्या प्रत्येक सोसायटीनें प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या एज्युकेशन फंडास, जो दर ठरविण्यांत येईल त्या दरानें रकम दिलीच पाहिजे. |
| (१०) आर्बिट्रेशन, रजिस्ट्रारचे निर्णय इत्यादींवरचीं अपिलें ऐकून निर्णय देण्यासाठीं एका स्वतंत्र मंडळाची आवश्यकता आहे. त्यामुळें सहकारी चळवळीवरील खात्याचें नियंत्रण थोडें सैल होईल. | (१०) बॉबे को. ट्रायब्यूनलचे कमाल तीन सभासद असावेत; सरकारच्या पूर्व संमतीनें ट्रायब्यूनलनें स्वतःच्या कारभाराबाबत नियम करावेत; ट्रायब्यूनलचा निवाडा अखेरचा बंधनकारक होईल; सिव्हिल किंवा रेव्हेन्यु कोर्टांस तो मानावा लागेल. |
| (११) ज्या सभासदांना कर्जे दिलीं त्यांना त्यांचा पैसा मिळू न देतां सोसायटीचे चेअरमन किंवा अधिकारी स्वतःच पैसा वापरतात. अशांना शासन होण्याची प्रभावी तजवीज होणें जरूर आहे. | (११) सोसायटीचा जो अधिकारी स्वतःच्या उपयोगासाठीं परंतु दुसऱ्याच्या नांवावर जाणूनबुजून कर्जाची शिफारस करतो किंवा कर्ज मंजूर करतो, त्यास ५०० रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा सुचविण्यांत आली आहे. |

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

## अध्यक्ष श्री. ग. रा. साठे यांचें अकराव्या वार्षिक सभेचे वेळचें भाषण

( तारीख २२-२-४८ )

कुटुंबांतील कर्ता पुरुष गेल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी जशी कुटुंबांतील सर्वांवरच येऊन पडते, तद्वतच महात्माजींच्या नेतृत्वानें प्राप्त झालेलें स्वराज्य त्यांचे मागे टिकविण्याची तसेंच वाढविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे, हें लक्षांत घेऊन निरनिराळ्या क्षेत्रांतील व्यक्तींनीं व संस्थांनीं प्रयत्नाची पराकाष्ठा करणें जरूर आहे. त्या दृष्टीनें आपल्या बँकेसारख्या संस्थांचें कार्य अतिशय महत्त्वाचें आहे. बँका व विमा कंपन्यांची कार्यक्षेत्रें दिवसेंदिवस आकुंचित करणारीं नियंत्रणें हरघडी नवीन नवीन लादण्यांत येत आहेत. आमचें आंतांपर्यंतचे अर्थतज्ज्ञ परक्या सत्तेस अभिप्रेत असलेल्या अर्थपरंपरेंतून निर्माण झालेले आहेत. त्यांपैकीं स्वतंत्र दिशेनें विचार करणारे अजिबात नाहींत असें नाहीं, पण त्यांचेपुढेंही इंग्लंड-अमेरिकेंत औद्योगिक वाढीचे शिगेस पोचल्यानंतर निर्माण झालेल्या संरक्षक अर्थशास्त्राचाच आदर्श असावा असें दिसतें. पण हिंदुस्थानला युद्धपूर्वकालीन जपान, १९३० ते १९४० चे दरम्यानचा जर्मनी अगर नुकतेंच क्षितिजावर चमकूं पाहणारें तुर्कस्तान यांचें शीघ्र गतीचें उत्पादक अर्थशास्त्र पाहिजे आहे. अर्थोत्पादन प्रथम व नंतर संरक्षण. सर विश्वेश्वर अय्या यांनीं जगाची आर्थिक पाहाणी केल्यावर हीच विचारसरणी मांडली आहे. सुरवातीस कांहीं धंदे बुडतील, कांहीं व्यक्ती फसतील, पण त्यांतून नवे धंदे निर्माण होतील असेंच त्यांनीं आपलें ठाम मत मांडलें आहे. आपल्या देशांत मात्र बँकिंगचें कार्यक्षेत्र अधिकाअधिक संकुचित करण्याचा रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न चालूं आहे.

इतर ठिकाणचा अनुभव तसाच असल्याचें दिसतें. 'ब्रिटन ॲन्ड ईस्ट' या इंग्लंडमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या मासिकांत तुर्कस्तानांतील "सुमेर" नांवाच्या एका बँकेची माहिती आली आहे ती खरोखरच आदर्श म्हणून घेण्यासारखी आहे. सदर बँक १९३३ मध्यें इतर राष्ट्रांच्या तावडींतून सुटून तुर्कस्तान स्वतंत्र झाला, त्या सुमारास अवघ्या ९३ लक्ष तुर्की पौंड भांडवलावर चालूं झाली. अवघ्या १४ वर्षांत सदर बँकेची मालमत्ता ३२ कोट, १० लक्ष पौंडावर गेली असून कंपनीच्या व्यवस्थापनेखालीं ५४ मुख्य व २० दुय्यम दर्जाचे कारखाने आहेत. म्हणजे, तुर्कस्तानसारख्या मागासलेला समजलेल्या देशांत औद्योगिक बँक कारखान्यांस भांडवल पुरवून मदत करूं तर शकतेच, पण स्वतः कारखानेहि चालवूं शकते व हें करून लोकांचा विश्वास वाढत्या प्रमाणावर मिळवूं शकते. आपल्याकडे मात्र बँकेच्या डायरेक्टर्सपैकीं एक जरी एखाद्या कारखान्याच्या संचालक बोर्डावर असला तरी अशा कंपनीस मामुली ग्राहकांस मिळणाऱ्या बँकिंग सवलतीहि मिळूं नयेत असा कायदा आतां होऊं घातला आहे. अशानें धंद्यांची वाढ कशी होणार तें रिझर्व्ह बँकेचे व सरकारचे अर्थतज्ज्ञच जाणोत !

जी बाब बँकिंगच्या धोरणाबाबत तीच विम्याबाबत व तीच देशाच्या औद्योगीकरणाच्या धोरणाबाबत. औद्योगीकरणाच्या धोरणाबाबत दर आठ-पंधरा दिवसांनीं उलट-सुलट खुलासे प्रतिखुलासे निरनिराळ्या जबाबदार अधिकारी व्यक्तींकडून प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. त्यामुळें एकंदर सर्वत्र साशंक वातावरण निर्माण झालें आहे.

यंदाचें बजेट अद्याप पुढें यावयाचें आहे. गेल्या वर्षी मुस्लिम लीगचे हट्टी अर्थमंत्र्यांचे खोड्यांत सरकार होतें. यंदा ती परिस्थिति बदललेली असून सरकार एकच जबाबदारीवर उभारलेलें असून एका विशिष्ट धोरणानें चालणारें आहे व पूर्णपणें अखत्यारी असलेलें आहे. आतां यंदा तरी बजेटांतील गेल्या वर्षाच्या चुका दुरुस्त व्हाव्यात अशी आपणा सर्वांची अपेक्षा आहे. कर नको असें कोणीच म्हणणार नाहीं, पण कराचे धोरणांत फरक पाहिजे आहे. उद्योगधंद्यांवरील प्रत्यक्ष कराचा बोजा कमी केला तरच धंद्यांची वाढ अधिक झपाट्यानें होणार आहे. वारसा मिळकतींवरील विशिष्ट मर्यादेपर्यंतचा कर, प्रत्यक्ष कराची तूट भरून काढून संपत्तीची अधिक समान वाटणी करण्यास मदत करणार आहे. कामगार सुखसोईवर होणारा खर्च पूर्णपणें करमाफ केल्यास राहणीचें मान वाढण्यास अधिक मदत होईल. याबाबत निरनिराळ्या आर्थिक क्षेत्रांतील संस्थांनीं सरकारवर वेळींच दडपण आणून यंदाचें बजेट देशाच्या प्रगतीस अनुकूल असें करून घ्यावयास पाहिजे.

इंडस्ट्रिअल फिनान्स कॉर्पोरेशनची योजना जनतेपुढें येऊन जवळजवळ दोन वर्षे होत आलीं; आतां कोठें त्या योजनेस कायदेशीर मूर्त स्वरूप देण्यांत आलें आहे. आतां सदर योजना अमलांत येण्यास किती कालावधी लागतो तें पहावयाचें आहे. कारण अद्याप तपशीलवार योजना ठरवावयाची आहे. तथापि हें कॉर्पोरेशन अस्तित्वांत आल्यावरहि मध्यम स्थितींतील उद्योगधंद्यांस त्याचा कितपत उपयोग होईल याबाबत शंकाच वाटते. वास्तविक पाहतां संपूर्ण आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निरनिराळ्या आर्थिक व औद्योगिक वाढीच्या योजना अमलांत आणण्यास इतका अवधी लागूं नये. पहिल्या युद्धानंतर जर्मनी अगदीं खंक झाला असतांनासुद्धां व खंडणीचा अवाढव्य बोजा डोक्यावर असतांनासुद्धां परिस्थितीची जाणीव होतांच व परकीय पाश थोडेसे ढिले होतांच अवघ्या ८-१० वर्षांच्या काळांत त्यानें आपलें जगांतील अव्वल दर्जाच्या राष्ट्रांबरोबरीचें स्थान प्राप्त करून घेतलें होतें. आजची हिंदुस्थानची आर्थिक पत तर वरच्या दर्जाची आहे. तेव्हां आपल्या देशास झपाट्यानें प्रगति करतां आली पाहिजे. १९३९ सालीं एका प्रसिद्ध जर्मन कारखानदाराशीं मार्कच्या सुवर्ण मूल्याच्या प्रमाणाबाबत बोलत असतांना त्यानें जें उत्तर दिलें होतें तें विचार करण्यासारखें आहे. त्याचे म्हणण्याप्रमाणें सोनें वा चांदी हींच कांहीं मूल्यमापनाची एकमेव साधनें नाहींत. जर्मनीची सात कोटी लोकसंख्या जगांतल्या कोठल्याहि सुवर्ण साठ्यापेक्षां भारी आहे. या दृष्टीनेंच आपल्या राष्ट्रास आपलें धोरण खंबीरपणानें आंखावयास पाहिजे आहे.

जर्मनीचे औद्योगिक पुनर्रचनेस जर्मनींतील बँकांचीच मदत झालेली होती. या दृष्टीनें विचार करून बँकांवरील नियंत्रणांबाबतचें सरकारी धोरण बदलावयास पाहिजे. विशेषतः औद्योगिक बँकांना तरी कांहीं मर्यादेपर्यंत विशेष सवलती द्यावयास पाहिजेत. पण हें आमच्या पुढाऱ्यांस पटवून दिले पाहिजे. विशिष्ट क्षेत्रांत प्रत्यक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सल्ला घेण्यास आपण भाग पाडलें पाहिजे.

तथापि सर्व नियंत्रणें सांभाळूनही आपल्या बँकेनें मूळ उद्दिष्ट पुढें ठेवून यावच्छक्य कार्य चालूं ठेवलेलें आहे, हें आपणांस कळविण्यास मला समाधान वाटतें.

## ब्रिटिश कापडाची व सुताची निर्गत

तुलनात्मक आकडे

| | कापड (कोटी चौ. वार) | किंमत (लक्ष पौंड) | सूत (वजन लक्ष पौंड) | किंमत (लक्ष पौंड) |
|---|---|---|---|---|
| १९३८ | १३९ | ३१९ | १२२९ | ९६ |
| १९३९ | १३९ | ३१९ | ११३६ | ८९ |
| १९४० | ९८ | ३२१ | ६६७ | ७४ |
| १९४१ | ७८ | २९९ | २८८ | ४४ |
| १९४२ | ४९ | २४३ | १८७ | ३३ |
| १९४३ | ३७ | २०२ | १९२ | ३३ |
| १९४४ | ४३ | २४१ | १९६ | ३२ |
| १९४५ | ४४ | २८७ | १६१ | २९ |
| १९४६ | ५१ | ४०३ | १९३ | ३७ |
| १९४७ | ५३ | ४९४ | २६६ | ६७ |

| कापडाच्या प्रमुख बाजार पेठा | कोटी चौ. वार | सुताच्या प्रमुख बाजार पेठा | वजन लक्ष पौंड |
|---|---|---|---|
| ब्रह्मदेश | ९ | ऑस्ट्रेलिया | ४७ |
| ब्रि. प. आफ्रिका | ७ | कानडा | ४५ |
| द. आफ्रिका | ६ | द. आफ्रिका | ४० |
| ऑस्ट्रेलिया | ५ | आयरा | १३ |
| ब्रि. मलाया | ४ | | |
| न्यूझीलंड | २ | | |
| ब्रि. पू. आफ्रिका | २ | | |
| द. ऱ्होडेशिया | १ | | |
| हिंदुस्थान | १ | | |

## मुंबई सहकारी कायद्यांत दुरुस्ती

### नियोजित बिलाचीं वैशिष्ट्यें

मुंबई सरकारचें १९२५ च्या बॉम्बे को. सोसायटीज ॲक्टांत दुरुस्ती करणारें बिल ता. ६ फेब्रुवारीच्या सरकारी गॅझिटांत प्रसिद्ध झालें आहे. (१) सहकारी चळवळीवरील नियंत्रणाचा सरकारी भाग क्रमशः कमी करणें, (२) प्राथमिक रिसोर्स सोसायट्यांच्या बाबतींत अनियंत्रित जबाबदारी वैकल्पिक करणें, (३) एका सोसायटीचें दोन अथवा अधिक संस्थांत इच्छेप्रमाणें रूपांतर करणें, (४) बेटर फार्मिंग सोसायट्यांना कायद्याच्या ११ व्या प्रकरणांतील सक्तीच्या बाबी लागू करणें, (५) सहकारी सोसायट्यांनीं सभासदांस दिलेल्या कर्जाच्या वसुलीची व्यवस्था करणें, (६) लवाद प्रकरणांतील अपिलाचा निवाडा करण्यासाठी "सहकारी ट्रिब्युनल" स्थापन करणें, इत्यादि प्रस्तुत बिलाचीं वैशिष्ट्यें आहेत.

**अमेरिकेची कोळशाची निर्यात**—अमेरिकेमधील कोळशाच्या उत्पादनांत १९३९ चे मानानें आतां ५० टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षी अमेरिकेनें युद्धपूर्व कालापेक्षा ६ पट अधिक कोळसा निर्यात केला. एकंदर ८ कोटी टनापेक्षा अधिक कोळसा निर्यात झाला. त्यापैकी निम्म्याहून अधिक युरोपला पाठविला गेला. युद्धापासून अमेरिका पेट्रोलिअम आयात करणारा देश झाला आहे. अमेरिकेंत पेट्रोलपासून बनविलेल्या मालापैकी ४० टक्के माल युरोपला पाठविण्यांत आला. अशा मालाचें युरोपमधील उत्पादन तेथील गरजेपेक्षा शेकडा ५८ टक्क्याहूनही कमी आहे.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

वरील बँकेच्या १९४७ सालच्या ताळेबंदांतील प्रमुख आकडे खालीलप्रमाणें आहेत:—

| भांडवल व देणें (रु.) | | जिंदगी व येणें (रु.) | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १६,००,००० | कर्जें, इ. | ९९,९०,९०७ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ३,९०,००० | जमनि-इमारत | २,२५,००० |
| ठेवी | १,८३,३५,५०६ | इन्व्हेस्टमेंट्स | ५६,१४,१०६ |
| १९४७चा निवळ नफा | १,९९,२१७ | शिल्लक | ४६,५६,०३८ |

१९४६ चे मानानें ठेवी व खेळतें भांडवल यांत थोडीशी वाढच झालेली आहे आणि निवळ नफ्याची रकमहि ज्यास्त आहे. आर्थिक व राजकीय परिस्थिति प्रतिकूल असताहि, बँकेच्या धंद्याचें प्रमाण कायम राहिलें आहे. १९४७ च्या एकूण निवळ नफ्यापैकी ९७ लक्ष रुपये करासाठी बाजूस काढून आणि २० हजार रु. रिझर्व्ह फंडांत टाकून ७१,२५० रुपयांचा विनियोग ५% डिव्हिडंडकडे करण्यांत येईल. बँकेच्या एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी कंपनीस झालेला नफा त्या कंपनीच्या पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढण्यांत आला आहे.

## युनायटेड कमर्शिअल बँकेची अनुकरणीय दक्षता व सावधागिरी

युनायटेड कमर्शिअल बँकेस १९४७ सालीं ४० लक्ष रु. नफा झाला. त्यापैकी १० लक्ष रु. रिझर्व फंडांत टाकून, १० लक्ष रु. करासाठी राखून ठेवून व २½ लक्ष रु. नोकरवर्गाच्या बोनससाठी बाजूस काढून १७½ लक्ष रु. उरतात. त्यांतून प्रत्येक भागास करमाफ १ रु. ८ आणे डिव्हिडंड देण्यास ६ लक्ष रु. लागतील. ११½ लक्ष रु. शिल्लक पुढील वर्षाचे हिशेबांत ओढण्यांत येईल. पश्चिम पंजाब, सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान येथील अस्वस्थ परिस्थितिमुळें बँकेच्या तेथील जिंदगीची छाननी करतां आली नाहीं. ह्या विभागांत बँकेनें तारणावर ३३ लक्ष रु. दिले होते. ह्या सर्व रकमेचा बँकेनें दंग्याचा विमा उतरलेला होता. बँकेस लावून दिलेल्या तारणाचे बाबतींत, कर्जदारांचा व बँकेच्या नोकर वर्गाचा अप्रामाणिकपणा व कपट ह्यांपासून बँकेस नुकसान पोचूं नये, ह्याबद्दलहि सर्वसाधारण विमा पॉलिसी बँकेनें काढलेली आहे. अशा रीतीनें बँकेचें दंगलीच्या विभागांतीलहि येणें सुरक्षित आहे. परंतु कर्जाचें तारण तपासून पहातां आलें नाहीं, ऐवढ्यासाठी पुढील वर्षाचे हिशेबांत मोठी शिलकी रकम ओढणें डायरेक्टरांस हितकर वाटत आहे. बँक पहिलेपासूनच आपल्या प्रत्येक शाखेचें स्वतंत्र सखंल ऑडिट करून घेत आहे आणि त्यासाठी भरपूर खर्च करीत आहे. अशा तऱ्हेची तपासणी फारच थोड्या बँका करीत असतात. बँकिंग कंपन्यांच्या कायद्याचे मसुद्यांत अशा तपासणीची तरतूद केलेली होती, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच.


अस्सल रशियन प्रोसेस ऑईलपेंट

परमपूज्य महात्माजींचा फोटो

सा. १२×१० किं. रु. १० फक्त

शिवाय लहान कॉपीज प्रत्येकीं आणे ३, ८

व फुल साईज ११ आणे.

सनेक्स फोटो स्टुडिओ

(पॅरेमाउंट लि.) १७९ बेलबाग चौक, पुणें २

## सोव्हिएट करपद्धति

लेखकः—ए अँटोनाव्ह    अनुवादकः—ग. रा. जोग

(ह्या विषयावरील पहिले दोन लेखांक ता. १४ व ता. २१ जानेवारीच्या अंकांत प्रसिद्ध झाले. हा लेखांक शेवटचा आहे.)

सोव्हिएट नागरिकांना व्यक्तिशः प्राप्तीवरील कर द्यावा लागतो. हा कर वाढत्या श्रेणीचा असतो आणि तींत कराची माफी व कमी-जास्त प्रमाणांत कर ह्या गोष्टींना सवड ठेवलेली असते. कमींत कमी, १५० रूबल्स मासिक प्राप्ति असेल तर प्राप्तीवरील कर द्यावा लागतो. तथापि पेन्शन मिळालेले नागरिक, लष्करांत नोकरी करणारे, हीरोज ऑफ दि सोव्हिएट युनिअन व हीरोज ऑफ सोशॅलिस्ट लेबर ह्यासारख्या पदव्या मिळालेले नागरिक, सरकारकडून तनखा मिळत असलेले नागरिक इत्यादि नागरिकांना हा कर द्यावा लागत नाहीं. संशोधनाकरितां दिलेली अगर एखाद्या कारखान्यांत तांत्रिक सुधारणा करण्याकरितां दिलेली रकम ह्यावरही कर आकारण्यांत येत नाहीं. कचेऱ्यांतून काम करणारे नोकर अगर कामगार ह्यांच्यावर जर तीन किंवा तीन माणसांपेक्षां अधिक माणसें अवलंबून असतील तर त्यांना करांत ३० टक्के सूट दिली जाते. प्राप्तीवरील कराची श्रेणी वाढत जाणारी असते. कराचा दर व्यक्तीच्या उत्पन्नाच्या मानानें कमी जास्त असतो. ही श्रेणी पुढीलप्रमाणें आहे.

| महिना उत्पन्नः रूबल्स | कराचा दरः टक्के |
|---|---|
| २०० | २॥ |
| ४०० | ४॥ |
| १,००० | ८·२ |

कोणत्याही कामगाराला उत्पन्नाच्या ८·२ टक्क्यापेक्षा अधिक भाग प्राप्तीवरील कर म्हणून द्यावा लागत नाहीं. ह्या बाबतींत सोव्हिएट नागरिकाला अगदी बेताचा कर द्यावा लागतो. रोज लागणाऱ्या चरितार्थाच्या वस्तूंवर अप्रत्यक्ष कर त्याला द्यावा लागत नाहीं. युद्ध चालू होतें तेव्हां सरकारचें उत्पन्न वाढविण्यासाठीं कांहीं विवक्षित नागरिकांवर जादा कर बसविण्यांत आले होते. जे लोक लष्करांत नोकरी करण्याच्या वयाचे असून ती करीत नव्हते, त्यांना उत्पन्नाच्या ५० टक्के जादा कर द्यावा लागत असे; परंतु १९४५ सालीं युद्ध संपल्यापासून हा कर रद्द करण्यांत आला आहे. रशिआंतील कलावंतांचीं व लेखकांचीं उत्पन्नें बरींच मोठीं असतात. ह्या लोकांवरील प्राप्तीच्या कराची आकारणी, कामगारांच्या वरील आकारणीपेक्षां वेगळ्या पद्धतीनें केली जाते. त्यांच्या उत्पन्नावर अधिक दरानें कर घेतला जातो. समजा एकाद्या लेखकाचें उत्पन्न दरवर्षी २४,००० रूबल्स आहे. ह्या लेखकाला प्राप्तीवरील कर म्हणून २,६०४ रूबल्स भरावे लागतील आणि शिवाय पुढील प्रत्येक १८,००० रूबल्स उत्पन्नावर १५ टक्के कर द्यावा लागेल. डॉक्टर्स, वकील आणि शिक्षक ह्यांच्या साठी कराचे दर वेगळे आहेत. त्याच प्रमाणें, कारागिरासाठींही वेगळा दर आहे.

### सामुदायिक शेतकरी कर कसा भरतो ?

सामुदायिक शेतावरील शेतकऱ्याच्या व्यक्तिशः उत्पन्नावर वेगळ्या पद्धतीनें कर आकारण्यांत येतो. सामुदायिक शेताच्या उत्पन्नांतून जो भाग त्याला मिळतो त्यावर अर्थातच त्याला कर भरावा लागत नाहीं. कारण, ह्या उत्पन्नावरील कर सामुदायिक शेताकडून घेतल्या जाणाऱ्या करांतच घेतला गेलेला असतो. परंतु, त्याला स्वतःला म्हणून जी वेगळी जमीन मिळालेली असते, त्यांतून निघणाऱ्या उत्पन्नावर प्राप्तीवरील कर घेतला जातो. कराची आकारणी करण्यासाठी एक सोपी पद्धत ठरविण्यांत आली आहे. प्रत्येक शेतकऱ्याला वहिवाटीला दिलेल्या जमिनींत तो कोणतें पीक काढतो, त्याच्याजवळ गुरें किती आहेत, इत्यादी बाबींचा विचार करून उत्पन्नाची सरासरी किंमत काढण्यांत येते. एक चाळिसांश एकर जमिनींत धान्य पिकविलें गेलें तर त्याची सरासरी किंमत ३० ते ४० रूबल्स धरण्यांत येते. तितक्याच क्षेत्रफळांत द्राक्षाचे वेल लावले असतील तर त्यांची किंमत १८० ते २४० रूबल्स धरण्यांत येते. प्रत्येक घोड्यामागें सरासरी २,००० ते २,५०० रूबल्स उत्पन्न धरण्यांत येतें. देशाच्या निरनिराळ्या भागांत हे सरासरी प्रमाण निरनिराळें धरण्यांत येतें. उत्पन्नाचा अंदाज अशा तऱ्हेनें बांधून झाल्यावर त्यावर निरनिराळ्या दरानें कराची आकारणी केली जाते. २,००० रूबल्सच्या उत्पन्नावर ८ टक्के व ८,००० रूबल्स अगर अधिक उत्पन्नावर ३० टक्के अशी ह्या श्रेणींची दोन टोकें आहेत. सामुदायिक शेतींत राबणाऱ्या व शिवाय स्वतःच्या वहिवाटीची जमीन करणाऱ्या शेतकऱ्यांना वरील प्रमाणें कर द्यावा लागतो. जे शेतकरी सामुदायिक शेतींत राबत नाहींत, त्यांच्यावरील कराचा दर दुप्पट ठेवला जातो. घरांतल्या घरांतच कांहीं जमीन म्हाताऱ्यांनीं अगर अपंगांनीं अगर शरिरानें अधू असलेल्या लोकांनीं लागवडीस आणली तर त्यांचेकडून प्राप्तीवरील कर घेतला जात नाहीं. लष्करांत नोकरी करणाऱ्या नागरिकांच्या बायकामुलांनीं जर त्यांच्या वहिवाटीची जमीन कसली तर त्यांनाही कर माफ केला जातो. शेतकऱ्यावर अवलंबून असणाऱ्या माणसांबद्दल करांत सूटही दिली जाते.

### स्थानिक कर

स्थानिक संस्थांना निर्यातींवर व स्थानिक उत्पन्नावर कर घेण्याचा अधिकार असतो. स्थानिक संस्थांचें उत्पन्न ह्या करांतूनच उभारलें जातें. हे कर पुढीलप्रमाणें आहेत. (१) इमारतीवरील करः—सरकारी व सार्वजनिक इमारती, ह्यांच्या किंमतीवर १ टक्क्याच्या निम्मा ह्या दरानें कर घेतला जातो. खाजगी मालकीच्या इमारतीवर १ टक्का कर घेण्यांत येतो. (२) जमीनीवरील करः—हा कर फक्त इमारतीसाठी वापरलेल्या व मोकळ्या जमिनीवर घेण्यांत येतो. शेतजमीनीवर घेण्यांत येत नाहीं. प्रत्येक चौरस मीटर जमीनीमागें ४ ते १८ कोपेक अशा निरनिराळ्या दरानें कर घेतला जातो. (एक रूबल म्हणजे १०० कोपेक; एक चौरस मीटर म्हणजे जवळ जवळ एक चौरस यार्ड.) हा कर सरकारी व सार्वजनिक संस्था ह्यांना त्यांनीं व्यापलेल्या जमिनीसाठीं द्यावा लागतो. खाजगी मालकीच्या घरवाल्यांनाही तो द्यावा लागतो. (३) वाहनावरील करः—देशाच्या प्रत्येक भागांत ह्या कराचें प्रमाण वेगवेगळें आहे. उदाहरणार्थ, मास्को शहरांत दर मोटारीमागें दरवर्षी २५ रूबल्स कर द्यावा लागतो. अधिक लहान शहरांतून हाच कर १० रूबल्स आहे. सामुदायिक अगर खाजगी शेतकरी आपल्या घोड्यावरील शेतकीचा कर देत असतात, त्यामुळें त्यांच्या मालकीच्या घोड्याच्या गाड्यांवर वाहनाचा कर घेतला जात नाहीं. (४) गुरांवरील करः—हा कर शहरांत राहणाऱ्या व गुरें पाळणाऱ्या लोकांकडूनच फक्त घेतला जातो. खेड्यांतील लोक हा कर त्यांच्या प्राप्तीवरील उत्पन्नाच्या कराच्या रूपांत देतातच. (५) सामुदायिक शेतींतील बाजारः—सामुदायिक शेतीच्या मालकीची जी बाजारहाट करण्याची इमारत असते, त्यांतील गाळा वापरण्याबद्दल कर घेतला जातो. (६) नोंदणीचा करः—व्यक्ती-व्यक्तींमधील कायद्याचे करार, लग्न, घटस्फोट, परदेश-प्रवासाचा परवाना इत्यादी कागदपत्रांची नोंद करण्यासाठी नोंदणी-फी घेतली जाते. जन्म, मृत्यू, दत्तक अगर वारस घेणें, किंवा मजूरविषयक प्रश्न इत्यादि कागदपत्रांच्या नोंदणीबद्दल फी घेतली जात नाहीं. (७) वारसाकरः—वारसा हक्कानें मिळालेल्या मिळक-

तीची किंमत जर ३०० ते १,००० रूबलस असेल तर २० रूबल्स कर द्यावा लागतो आणि १०,००० रूबलसपेक्षा अधिक किंमत असेल तर शेकडा १० टक्के कर द्यावा लागतो. (८) आयात-निर्यात कर:--आयातीवरील कर सोव्हिएट युनिअन आणि परदेश ह्यांच्यावरील संबंधांवर अवलंबून असतो. घोडे, उंट, मेंढरें, मऊ लोकर असलेलीं कमावलेलीं कातडीं इत्यादि मालाच्या निर्यातीवर कर घेतला जातो.

### राष्ट्रीय आणि स्थानिक खर्च

रशिआंत कोणकोणते कर घेतले जातात हें वर सांगितलें. ह्या करापासून होणारें उत्पन्न रशिआचें मध्यवर्ती सरकार, निरनिराळीं राष्ट्रीय सरकारें आणि स्थानिक संस्था ह्यांच्यांत विभागलें जातें. व्यक्तीच्या उत्पन्नावरील कर ( शेतीचा कर धरून ) आणि स्थानिक कर हे साधारणपणें स्थानिक संस्थांच्या मालकीचे असतात. ह्या करांत मध्यवर्ती सरकार व राष्ट्रीय सरकारें ह्यांना कांहीं हिस्सा मिळत नाहीं. सरकारच्या मालकीच्या उत्पादक संस्था आणि कारखाने ह्यांच्याकडून घेण्यांत येणाऱ्या करानें उत्पन्न मध्यवर्ती सरकार आणि स्थानिक संस्था ह्यांना वाटून देण्यांत येते. अशा तऱ्हेनें रशिआंतील करपद्धतीमुळें मध्यवर्ती सरकार, राष्ट्रीय सरकारें आणि स्थानिक संस्था ह्या सर्वांना पुरेसें उत्पन्न उभारतां येतें. रशिआंतील १६ युनिअन रिपब्लिक राज्यांसाठीं ( राष्ट्रीय सरकारें ) मध्यवर्ती रशिअन सरकारकडून अधिक मदतही मिळण्याची सोय असते. सरकारच्या मालकीच्या कारखान्यांकडून जो कर घेतला जातो, त्यांतूनच जवळ जवळ सर्व सार्वजनिक स्वरूपाचा खर्च भागविण्यांत येतो हें लक्षांत ठेवलें पाहिजे. १९४७ सालीं सरकारच्या एकंदर उत्पन्नापैकीं ८० टक्के उत्पन्न कारखान्यांवरील करांपासून आलेलें होतें.

### सामाजिक विम्याची पद्धत

सरकारचें उत्पन्न दरवर्षी वाढत आहे. सोव्हिएट सरकार आपल्या एकंदर खर्चापैकीं हल्लीं फक्त १८ टक्के खर्च लष्करावर करते. खर्चापैकीं ६४ टक्के खर्च, राष्ट्रीय अर्थोत्पादन वाढविण्यासाठीं आणि नागरिकांच्या सुखसोयी वाढविण्यासाठीं केला जातो. सोव्हिएट नागरिकांना व्यक्तिशः फारच अल्प कर द्यावा लागतो. असें असून सुद्धा नागरिकांच्या सुखसोयी अधिक वाढत आहेत आणि त्यांत सारखी सुधारणा करण्यांत येत आहे. वृद्धापकाळीं पेन्शन, आजारीपणांत भत्ता व विमा इत्यादींसाठीं सोव्हिएट नागरिकांना कांहीं खर्च करावा लागत नाहीं. सामाजिक विम्याची पद्धत असल्यामुळें नागरिकांना वेगळा खर्च करावा लागत नाहीं हें क्रमप्राप्तच आहे. सोव्हिएट नागरिकांचें व्यक्तिशः उत्पन्न हळूहळू वाढत आहे; त्यांच्यावर कराचा बोजाही हलका आहे. त्यामुळें सरकारनें नुकत्याच विक्रीस काढलेल्या कर्जाची रक्कम हां हां म्हणता उभारली गेली. सोव्हिएट नागरिकांनीं, बचत केलेला आपला पैसा अशा रीतीनें स्वेच्छेनें सरकारला कर्जाऊ देऊन आपली देशभक्तीची भावना प्रगट केली आहे. सरकारला कर्जाची ही एक नवीनच उत्पन्नाची बाब हातांशीं मिळाली आहे ४ मे, १९४७ रोजीं सोव्हिएट सरकारनें २,००० कोटी रूबलसचें कर्ज विक्रीस काढलें होतें; तें फक्त २४ तासांत त्याहीपेक्षा अधिक मागणी येऊन विकलें गेलें.

---

**हातमागाच्या कापडाची निर्यात**—गिरण्यांतून निघणाऱ्या कापडाची वाटप व नियंत्रणपद्धति बंद झाली असल्यामुळें हातमागावर निघणारें आणि यांत्रिक मागावर छोट्या प्रमाणांत निघणारें कापड हिंदी संघराज्यांत कोठें ी अनिर्बंध पाठवितां यावें असा निर्णय मुंबई सरकारनें घेतला आहे.

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था
दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २
—आमचीं वैशिष्ट्यें—
( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.
विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.
—मॅनेजिंग डायरेक्टर

दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)
पुणें शाखा:–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.
मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड
हेड ऑफिस:—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.
★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ, विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.
आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.
शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर






दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,००
जमा झालेलें भांडवल रु. ७,११,८९०
खेळतें भांडवल रु. ६६,५०,०००

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
" बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे."

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

श्री

दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट
लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

## घटस्फोटाविषयीं महत्त्वाचा निवाडा

### संतती हा विवाहाचा एकमेव प्रमुख हेतु आहे काय ?

( मि. बॅक्स्टर ह्यांस संतति हवी होती. मिसेस बॅक्स्टर ह्यांस ती नको होती. मि. बॅक्स्टर ह्यांनीं आपल्या पत्नीचें मत बदलण्याचा सतत १० वर्षें प्रयत्न केला, परंतु तो निष्फळ ठरला. म्हणून, त्यांनीं काडीमोडीची मागणी केली, ती मिळाली असती म्हणजे त्यांस संततीस कबूल असणाऱ्या, दुसऱ्या, स्त्रीशीं विवाह करता आला असता. मि. बॅक्स्टर ह्यांच्या परिस्थितीमधील पुरुषास अगर स्त्रीस उपाय उरलेला नाहीं, असें खालील विवेचनावरून स्पष्ट होईल. )

ब्रिटिश लॉर्डांच्या सभेच्या ज्युडिशिअल कमिटीनें घटस्फोटाबाबत नुकताच केलेला एक निवाडा मोठा मनोरंजक आहे. नवऱ्याची तक्रार अशी होती कीं, त्यानें संतति-प्रतिबंधक खबरदारी आगाऊ घेतलेली असेल तरच त्याची पत्नी त्याच्याशीं संभोगास तयार होई; त्यामुळें विवाहाची पूर्ती होणें अशक्य झालें. नवऱ्यानें घटस्फोट मागितला, परंतु ज्युडीशिअल कमिटीनें तो देण्याचें नाकारलें. ज्यानें सबंद विवाहच रद्द व्हावा इतक्या महत्त्वाचा अपत्य-निर्मिति हा विवाहाचा उद्देश नाहीं आणि ही निर्मिति पति–पत्नीपैकीं एकानें अशक्यप्राय केली म्हणून तेवढ्याकरतां केवळ दुसऱ्यास घटस्फोट मिळणार नाहीं, असें कमिटीचें मत पडलें. "विवाहबद्ध होण्याचे अनेक हेतू असूं शकतील आणि अपत्य-निर्मिती हा त्यांपैकी एक प्रमुख हेतू असला तरी तो **एकमेव** हेतू नाहीं." विवाहाची पूर्ती शरीरानें वा मनानें करण्याची शक्यता पति–पत्नीपैकीं एकांत जरी नसेल तर विवाहामुळें जें नातें निर्माण व्हावयाची अपेक्षा असते, ती अपेक्षा फलद्रूप होणें **कायमचें अशक्य** होतें परंतु, बुद्धिपुरस्सर विवाहाची पूर्ती टाळण्यानें तसा **कायमचा** परिणाम घडून येत नाहीं, असा कायद्याचा अर्थ ठरला तरी तो इष्ट आहे किंवा नाहीं, हा प्रश्न आहेच. अपत्य ही विवाहाची स्वाभाविकच निष्पत्ति आहे, असें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या मान्य केल्या नंतर, मागाहून ह्या समजुतीस बाधक असें वर्तन करणें योग्य नाहीं आणि घटस्फोटास हें कारण पुरेसें असावें, असें मत ग्रेट ब्रिटनमध्यें व्यक्त केलें जात आहे.

लॉर्डांच्या ज्युडीशिअल कमिटीच्या ह्या निवाड्यासंबंधीं ब्रिटिश कॉमन्स सभेंत प्रश्न विचारण्यांत आला, तेव्हां सरकारचे अटर्नें जनरल, सर हार्टले शॉ–क्रॉस, ह्यांनीं सांगितलें कीं, घटस्फोटाच्या विद्यमान कायद्यांत बदल करण्याचा सरकारचा विचार नाहीं. ते म्हणाले, "विवाह झाल्यानंतर, संततिनियमनाचीं साधनें स्त्री-पुरुषांपैकीं कोणीही वापरतो एवढ्यानेंच केवळ विवाहाची **कायद्याप्रमाणें** पूर्ती होण्याचें टळत नाहीं, असा ह्या निवाड्याचा साधा अर्थ आहे."

### पाकिस्तान सरकारची कर्ज उभारणी

पाकिस्तान सरकारनें १½ % ते ३% व्याजाचे व १९५८ ते १९६८ पर्यंतच्या मुदतीचे कर्जरोखे विक्रीस काढले आहेत. त्यांची विक्री, सरकार ती थांबवीपर्यंत चालू राहील. कर्जरोख्यांचा तपशील खाली दिला आहे:—

| परतफेडीचें वर्ष | व्याजाचा दर |
|---|---|
| १९६८ | ३% |
| १९६० | ३% |
| १९५३/५४ | २¾% |
| १९५८ बेअरर बॉंडस | १½% कर–माफ |

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७१, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन यांचे
विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.




कृष्णा शुगर मिल्स लि.
कृष्णा–कित्तूर
कन्फेक्शनरी सुरू झाली.
धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.
६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.
विशेष माहितीसाठी लिहा.
पोस्टः–कृष्णा–कित्तूर
जिल्हाः–बेळगांव.
विंचूरकर ॲण्ड को.
मॅनेजिंग एजण्टस्.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें